# अमर हिंद मंडळ, दादर

## क्रीडा विभाग अहवाल

### ०१ जानेवारी १९८८ ते ३१ मार्च १९८९

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाहि मंडळाच्या खो खो संघानी व खेळाडूंनी विजयी घौडदौड पुढे अव्याहतपणे चालूं ठेवली. या कालावाधीत आपल्या संघानी खालील ठिकाणी पारितोषिके पटकाविली.

१) २९/१२/८७ ते १/१/८८ या दरम्यान मंडळाच्या वतीने किशोर/किशोरी गटांच्या जिल्हा अजिंक्यपद व चाचणी स्पर्धेत आपल्या किशोरी संघाने अजिंक्यपद पटकाविले. या स्पर्धेत आपल्या कु. स्वाती घरत हिला उत्कृष्ट सरंक्षकाचे तर कु. आदिती कांबळे हिला अष्टपैलू खेळाडूंचे पारितोषिक मिळाले.

२) दि. १४/१२/८८ ते १८/१२/८८ या दरम्यान युवक क्रीडा मंडळ परळ यांच्यावतीने झालेल्या जिल्हा अजिंक्यपद व चाचणी स्पर्धेत आपल्या महिला संघाने उपविजेतेपद मिळविले. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट आक्रमकांचे पारितोषिक आपल्या संघाच्या कु. अमला आंग्रे या अष्टपैलू खेळांडूचे पारितोषिक कु. सुरेखा नाईक हिंने पटकाविले.

३) दि. ४/१/८९ ते ८/१/८९ या दरम्यान श्री स्पोर्टस क्लब, लालबाग यांच्या सहकार्याने झालेल्या जिल्हा अजिंक्यपद व चाचणी स्पर्धेत आपल्या मुलींच्या संघाने विजेतपद पटाकाविले. सर्वोत्कृष्ट खेळाडूंचे पारितोषिक आपल्या संघाच्या कु. अर्चना मयेकर हिला मिळाले.

४) दि. १४/१/८९ ते १९/१/८९ या दरम्यान जयभवानी क्रीडा मंडळ, चिंचपोकळी या संस्थेच्या वतीने झालेल्या जिल्हा अजिंक्यापद स्पर्धेत आपल्या किशोरी संघाने विजेतपद मिळविले. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट आक्रमकांचे पारितोषिक कु. गीतांजली जगताप तर अष्टपैलू खेळांडूचे कु. शीतल जगताप हिला मिळाले.

आपल्या खालील खेळाडूंची मुंबईच्या संघातून निवड झाली होती.

१) दि. २७ जाने. ८८ ते ३०/१/८८ या दरम्यान नांदेड येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व चाचणी स्पर्धा.

किशोरी गट : आदिती कांबळे (कर्णधार), स्वाती घरत, शिल्पा तोरणे, सोनाली जगताप, विजय राणे (शिक्षक)

२) दि. ७ जाने. ८९ ते १० जाने. १९८९ या दरम्यान सोलापूर येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व चाचणी स्पर्धा.

किशोरी गट : स्वाती घरत (कर्णधार) शीतल जगताप, गीतांजली जगताप, वैभव राडये (व्यवस्थापक)

३) दि. २२ डिसें. ८८ ते २४ डिसें. ८८ या दरम्यान बोरगांव येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व चाचणी स्पर्धा

महिला गट : गायत्री पवार (कर्णधार), सुरेखा नाईक, अर्चना मयेकर, अमला आंग्रे, नीलम साने.

४) दि. ११ फेब्रु. ८९ ते २० फेब्रु. ८९ या दरम्यान उस्मानाबाद येथे झालेली राज्य अजिंक्यपद व चाचणी स्पर्धा :-

मुली : अर्चना मयेकर (कर्णधार), जयश्री यादव, अर्पणा वेद्य, उत्कर्षा शेणॉय.

कुमार : दिलदार म्हात्रे

५) मुंबई विद्यापीठीय संघात खालील खेळाडूंचा समावेश होता. निलीमा पालकर (कर्णधार), गायत्री पवार, माधुरी देसाई.

६) मार्च १९८९ मध्ये पश्चिम बंगाल येथे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत (मिनी नॅशनलस) आपल्या संस्थेच्या कु. उत्कर्षा शेणॉय हिने महाराष्ट्राचे नेतृत्व केले.

**न. ज. मयेकर**

कार्यवाह